मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २६५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# विविध मागण्यांसाठी दिव्यांगांची निदर्शने

**जालना । प्रतिनिधी -** आपल्या विविध मागण्यांसाठी सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या वतीने सोमवारी (दि.२८) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. निदर्शनापूर्वी सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या वतीने अंबड चौफुलीवरून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शंकर शिरगुळे, जिल्हाध्यक्ष राहूल मुळे, लक्ष्मीबाई भुतडा, मुन्नाभाऊ दायमा, सतीश फतपुरे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केल्यानंतर सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या वतीने तहसीलदार आर. के. मेंडके यांच्या हस्ते जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात आंध्र प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रात दिव्यांगांना सहा हजार मानधन सुरू करण्यात यावे, जालना शहरातील मधुबन कॉलनी किंवा मस्तगड येथे दिव्यांगांसाठी पुर्नवसन केंद्र सुरू करावे, ग्रामपंचायतीच्या धर्तीवर दिव्यांगांना नगर पंचायत, नगर परीषद, महानगर पालीकामधे नळपट्टी, घरपट्टीमध्ये ५० टक्के सूट देण्यात यावी, दिव्यांगांनी घेतलेले कर्ज माफ करण्यात यावे, दिव्यांगांना दिव्यांग वित्त विकास महामंडळाकडुन विनाअट व विनाहमी १० लक्ष रूपये कर्ज देण्याची तरतुद करण्यात यावी, दिव्यांगांना उधारनिर्वाह करण्यासाठी ग्रामपंचायत, नगर




पंचायत, नगर परिषद, महानगर पालिका यांनी शासन निर्णय नुसार २०० स्वेअर. फुट जागा उपलब्ध करून देण्यात यावी, दिव्यांगासाठी २०१६ मधील कायद्याची देशभर कडकपणे अंमलबजावणी करण्यात यावी, दिव्यांगांसाठी जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, शासकिय रुग्णालय, महानगर पालिका आदी शासकीय कार्यालयामध्ये स्वतंत्र खिडकी निर्माण करण्यात यावी, म्हाडा कॉलनी येथील दिव्यांग सविता बोराडे यांच्या वरती सतत अन्याय होत असून याकडे तालुका पोलीस ठाणे दुर्लक्ष करत आहे तातडीने आरोपीला अटक करण्यात यावी, दरवर्षी स्थानिक आमदार फंडातून निधीतुन दिव्यांगावर ३० लक्ष खर्च करण्यात यावा, दिव्यांगाचा बचत गटांना २ लाख अनुदान देण्याची तरतुद करण्यात यावी आदी मागण्यांचा समावेश आहे.

या मागण्याची त्वरीत दखल घेऊन त्या सोडविण्यात याव्यात नसता सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या वतीने शांततेच्या मार्गाने व लोकशाही पध्दतीने येत्या काही दिवसात संपुर्ण महाराष्ट्रात रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या निदर्शनसमयी जगदीश सातपुते, विठ्ठल चव्हाण, सुरेश बोराडे, सतीश वाघ, इंदुबाई अवसरमोल, ठकुबाई डोंगरे, रोशन अवसरमोल, कांताबाई आघाम, सागरबाई धोंगडे, गणेश खंदारे, नागेश अंबिलवादे, शहादेव कोल्हे, अनिल महापुरे, रेहान निसार शेख, शेख शफीकमिया, गोविंद चिखले, रुख्मिणी सपकाळ, सुनंदा भास्करे, बाळू आगलावे, विलास कांबळे, राजेश कावेटी, सुधाकर पवार, साबेर शेख, शेख इक्बाल, सुनिता खंदारे, नंदकिशोर चव्हाण, पुरूषोत्तम अडाणी, सुनिता लोळगे, भीमराव साळवे, नानाभाऊ सुरासे, अशोक कणके आदींची उपस्थिती होती.

## राजकीय सामाजिक क्षेत्रातून पाठींबा

जालन्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चा काढत निदर्शने केले असून दिव्यांगाच्या विविध मागण्यांसाठी जालन्यातील सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी दिव्यांगाच्या मागण्यांसाठी पाठिंबा दिला आहे शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले, सुभाष चंद्र बोस संस्थापक अध्यक्ष रतन लांडगे, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, मनसेचे शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे आदींनी दिव्यांगाच्या मागण्यासाठी पाठिंबा दिला आहे

## दिव्यांगाच्या मागण्यांसाठी आमदार खोतकर पाठपुरावा करणार

दिव्यांगांच्या ज्या मागण्या असतील त्या मागण्यासाठी लवकरच जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेत बैठक लावून दिव्यांगांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहू अशी माहिती आमदार अर्जुन खोतकर यांनी दिव्यांगांना दिली आहे.

सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव!

# ... हा सनातन धर्माच्या पुनर्स्थापनेचा जागर!

## प.पू. स्वामी गोविंददेव गिरि

**फोंडा । प्रतिनिधी -** सनातन संस्थेच्या माध्यमातून गेली २५ वर्षे अविरतपणे हिंदु राष्ट्रासाठी जागरण करत असलेले परमश्रद्धेय डॉ. जयंत आठवले यांचे कार्य अलौकिक आणि अत्यंत विलक्षण आहे. त्यांच्या ८३ व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने गोवा येथे १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. हा केवळ महोत्सव नसून भारताला पुन्हा तेजस्वी, समर्थ बनवण्याचा आणि सनातन धर्माची पुनर्स्थापना करण्याचा जागर आहे, असे गौरवोद्गार 'श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासा'चे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरि यांनी महोत्सवासाठी पाठवलेल्या शुभसंदेशात काढले आहेत.




ते पुढे म्हणाले की, 'सनातन संस्था'च्या माध्यमातून गेल्या २५ वर्षांपूर्वी सुरू केलेल्या कार्याची फलश्रुती म्हणून आज हजारोंच्या संख्येने समर्पित कार्यकर्ते स्थानस्थानावर जाऊन निष्काम भावनेने व स्वयंशिस्तीने सनातन धर्माचा प्रसार करत आहेत. या कार्यकर्त्यांनी स्वतःच्या जीवनाचा स्वाध्याययज्ञ, सेवायज्ञ आणि लोकजागरणयज्ञ सुरू केला आहे. हे कार्य अत्यंत विलक्षण आहे आणि त्यातूनच सनातन राष्ट्राच्या अभ्युदयाचा मार्ग उजळणार आहे.

या महोत्सवात विविध राष्ट्रनिष्ठ नेते, धर्माचार्य, कार्यकर्ते आणि सनातनप्रेमी एकत्र येऊन विचारमंथन करणार आहेत. या मंथनातून केवळ नवनीत नव्हे, तर अमृत उदयाला येईल आणि याच अमृतकलशातून सनातन राष्ट्राला नवतेज प्राप्त होईल. आज भारताला समर्थ राष्ट्र बनवायचे असेल, तर सनातन धर्माच्या मूलभूत तत्त्वांची पुनः स्थापना करणे अत्यावश्यक आहे; कारण भारताच्या सामर्थ्यावरच जगात समता, बंधुता आणि खरी स्वतंत्रता टिकू शकते. म्हणूनच हे कार्य एखाद्या व्यक्तीचे किंवा एखाद्या संस्थेचे नसून, धर्माचे आणि राष्ट्राचे कार्य आहे. आणि म्हणूनच हे प्रत्यक्ष भगवानाचे कार्य आहे. त्यामुळे सर्व धर्मप्रेमी, राष्ट्रनिष्ठ कार्यकर्त्यांनी, नेत्यांनी, धर्मगुरूंनी आणि सामान्य भक्तांनी या महोत्सवात सहभागी होऊन आपल्या श्रद्धेचे आणि सेवाभावाचे योगदान द्यावे. सनातन धर्माची मूळ अधिक बळकट करण्यासाठी आणि भारताच्या सुंदर, समृद्ध भविष्यासाठी हा महोत्सव एक सुवर्णसंधी आहे. या महामंथनातून मिळणाऱ्या तेजाने भारत गगनभरारी घेईल आणि सनातन धर्माचा दिव्य प्रकाश संपूर्ण जगात पसरेल. म्हणून आपण सर्वांनी एकत्र येऊन या दिव्य कार्यात सहभागी होऊया आणि भारताला त्याच्या सनातन तेजाने पुन्हा उभे करूया, असेही आवाहन त्यांनी शेवटी केले आहे.

युवा आदर्श

### सल्ला ...

महागात पडे तुम्हां
दहशतवादी हल्ला
बुध्दी दिवाळखोरी
बहिरे ऐकेना सल्ला
शक्ती क्षेपणास्त्रांचा
दावा मुर्खांना पल्ला
महादेव असे भारत
कळेना सर्प पिल्ला
दहशतवादी पंगती
घरी न दाणे खायला
इज्जत विके जगात
अक्कल नग्न दल्ला
माथेफिरु रे संघटना
मिरवत फिरे बिल्ला
स्वताचे अस्तीत्वावर
भिकमंगे मारे डल्ला
काश्मीरवरती हक्क
कांगावा खोरी कल्ला
आव्हान देतात मुर्ख
कसे कसल्या मल्ला
युद्ध साहित्य अजस्त्र
खाली तिजोरी गल्ला
विरोधा पुरा मोहल्ला
खंडहर करी किल्ला

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# सेवा हक्क दिनानिमित्त मनपात डिजिटल बोर्ड आणि क्यूआर कोडचे लोकार्पण




**जालना । प्रतिनिधी -** सेवा हक्क दिनानिमित्त जालना महापालिका कार्यालयात आज डिजिटल बोर्ड, आणि क्यूआर कोडचे लोकार्पण करण्यात आले आहे. सोमवार (दि २८) रोजी दुपारी जालना महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांच्या हस्ते फीत कापून डिजिटल बोर्ड आणि क्यूआर कोडचे लोकार्पण करण्यात आले. आज सेवा हक्क दिन साजरा करण्यात येत आहे. या दिनाचे औचित्य साधून आज जालना महापालिका कार्यालयात उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा पालिका आयुक्तांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे. तसेच यावेळी सेवा हक्क दिनानिमित्त पान २ वर

# जाफराबाद आगारातून सोलापूर बस सुरू

## मानव सेवा मंडळाच्या कार्याला यश

**दत्ता देशमुख**
**टेंभुर्णी -** जाफराबाद आगारातून जाफराबाद सोलापूर ही लांब पल्ल्याची बस सेवा रविवारपासून सुरू करण्यात आली आहे. टेंभुर्णी येथील मानव सेवा मंडळ या सेवाभावी संस्थेने जाफराबाद-शिर्डी व जाफराबाद- पंढरपूर या दोन बस सेवा सुरू करण्याची मागणी आगार प्रमुख रणजीत राजपूत यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे केली होती. त्यानुसार या बस सेवा सुरू करणे बाबत राजपूत यांनी वरिष्ठ कार्यालयाची परवानगी मागितली होती. त्यानुसार जाफराबाद आगारातून सोलापूर व जाफराबाद- पान २ वर



# 'कालीका स्टील्स'ला 'सस्टेनेबिलिटी व पर्यावरण जाणीवपूर्वक उत्पादन' पुरस्कार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** भारतातील एक अग्रगण्य स्टील उत्पादक कंपनी असलेल्या 'कालीका स्टील्स'ला 'सीएमआयए २०२५' पुरस्कारांमध्ये 'सस्टेनेबिलिटी व पर्यावरण जाणीवपूर्वक उत्पादन' या श्रेणीत गौरवण्यात आले. हा पुरस्कार २७ एप्रिल २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

१५० हून अधिक अर्जदारांची सखोल तपासणी व मुलाखतीनंतर पाच तज्ज्ञांच्या स्वतंत्र परीक्षक समितीने कालीका स्टील्सची निवड केली. पुरस्कार स्विकारताना घनश्याम गोयल, अनुज बन्सल आणि यश गोयल उपस्थित होते.

दोन दशकांहून अधिक उत्पादन उत्कृष्टतेचा वारसा असलेल्या कालीका स्टील्सने पर्यावरण संरक्षणासाठी 'शून्य निःसारण' धोरण अवलंबले आहे. त्यांच्या पर्यावरणीय व सामाजिक बांधिलकीच्या कार्याला मिळालेल्या या सन्मानामुळे औद्योगिक क्षेत्रात विशेष आनंद व्यक्त होत आहे.

**सस्टेनेबिलिटी व पर्यावरण जाणीवपूर्वक उत्पादन म्हणजे काय?**
सस्टेनेबिलिटी व पर्यावरण जाणीवपूर्वक उत्पादन म्हणजे काय? याचा अर्थ असा की, आपण उत्पादन करताना पर्यावरणाची काळजी घ्यावी, ज्यामुळे भविष्यात आपल्या नैसर्गिक संसाधनांना धोका निर्माण होणार नाही. शाश्वत (Sustainable) उत्पादन म्हणजे असे उत्पादन जे पर्यावरण आणि समाजासाठी चांगले असते, आणि ज्याचा उपयोग करून आपण आपल्या गरजा पूर्ण करू शकतो.

**पर्यावरण जाणीवपूर्वक उत्पादनः**
उत्पादन प्रक्रियेत, आपण पर्यावरणाला कमीत कमी नुकसान होईल अशा कच्च्या मालाचा वापर करावा.

**ऊर्जा वापर कमी करणेः**
उत्पादन प्रक्रियेत ऊर्जेचा वापर कमी करावा, ज्यामुळे नैसर्गिक संसाधने वाचतील.

**कचरा व्यवस्थापनः**
उत्पादन प्रक्रियेतून निघणारा कचरा व्यवस्थित पुनर्वापर किंवा योग्य पद्धतीने नष्ट करावा, जेणेकरून पर्यावरणावर नकारात्मक परिणाम होणार नाही.

**पर्यावरणपूरक पॅकेजिंगः**
उत्पादनाचे पॅकेजिंगदेखील पर्यावरणास अनुकूल असावे, म्हणजे ते पुनर्वापर करता येणारे किंवा नैसर्गिकरित्या नष्ट होणारे असावे.

**सस्टेनेबिलिटी आणि पर्यावरण जाणीवपूर्वक उत्पादन करण्याचे फायदेः**
यामुळे नैसर्गिक संसाधने जसे की पाणी, पर्यावरणावर नकारात्मक परिणाम कमी होऊन ते अधिक चांगले राहते. भविष्यातील पिढ्यांसाठी एक चांगली




हवा, जंगल, माती यांचे संरक्षण होते. प्रदूषण कमी होऊन हवा आणि पाणी शुद्ध राहते. आणि सुरक्षित जागा निर्माण होते. काहीवेळा सस्टेनेबल उत्पादन प्रक्रियेमुळे उत्पादन खर्च कमी होऊ शकतो.

# जालना जिल्ह्यात ५२ टँकर सुरू; ५७ विहिरींचं अधिग्रहण

**जालना । प्रतिनिधी** - जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणासाठी प्रशासनाकडून ५२ टँकर सुरु करण्यात आले असून ५७ विहीरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात दिवसेंदिवस पाणीटंचाईची समस्या अधिकाधिक भेडसावत असून त्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाकडून नियोजन आराखडा तयार करण्याचं काम सुरु करण्यात आलंय. पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांना टँकर सुरू करण्याचे अधिकार देण्यात आले असून प्रस्ताव येताच गावातील पाण्याची परिस्थिती पाहून तातडीनं टँकर सुरू करा, असे निर्देश जालना जिल्हाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. जिल्ह्यातील लघु आणि मध्यम प्रकल्पात २० टक्केच पाणीसाठा उपलब्ध असल्याचं देखील जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केलंय.



# गोरोबा काकांच्या अभंगात भक्ती व प्रेमाची अनुभूती - दानवे

**जालना । प्रतिनिधी** - वारकरी संप्रदायातील प्रसिद्ध संत , विठ्ठलाचे निष्ठावान भक्त गोरोबा कुंभार यांनी आपल्या अभंगातून विठ्ठलाचे प्रेम आणि भक्ती व्यक्त केली.भक्ती आणि वैराग्याने संतांच्या मंडळीत एक विशेष स्थान मिळवलेल्या गोरोबा काकांची पुण्यतिथी पुढील वर्षी अधिक जोमाने साजरी करावी, आयोजनात आपले पूर्ण सहकार्य राहील. अशी हमी भारतीय जनता पक्षाचे जालना विधानसभा प्रमुख भास्करराव पाटील दानवे यांनी दिली.

महाराष्ट्र कुंभार समाज सामाजिक संस्थेच्या वतीने संत गोरोबा काका यांच्या ७०८ व्या पुण्यतिथी निमित्त प्रतीवर्षाप्रमाणे यंदा ही शनिवारी ( ता.२६) कुंभार समाज सामाजिक संस्थेचे मराठवाडा अध्यक्ष दिगंबरराव पेरे यांच्या निवासस्थानी भारतीय जनता पक्षाचे जालना विधानसभा प्रमुख भास्करराव पाटील दानवे, जालना मर्चंट्स को- ऑप. बँकेचे संचालक अंकुशराव राऊत,शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, दिगंबर पेरे,जिल्हाध्यक्ष तथा सरपंच बद्रीनारायण भसांडे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.

शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांनी संत गोरोबा काकांची परमार्थिक पदवी ही उच्च दर्जाची होती.त्यांनी भक्तीचे वैभव मिळवले होते, असे सांगून पुण्यतिथीच्या उपक्रमांना आपले पूर्ण सहकार्य राहील असे पाचफुले यांनी सांगितले.

या प्रसंगी संजय शहाणे, कृष्णा पांगारकर, काशिनाथ बेनिवाल , राम शहाणे, बालाजी घोडके, मनोज वर्मा या भजनी मंडळाने विठ्ठल नामाचा गजर, गोरोबा काकांचे अभंग, भजने म्हंटली, महाआरती, व शेवटी भाविकांना महाप्रसाद वितरित करण्यात आला.या वेळी युवा जिल्हाध्यक्ष कृष्णा संत्रे, अरुण पेरे,संजय गोडबोले,जगन गोधेकर, लोकेश पेरे,मनोज गोदेकर, शुभम जोरले,अशोक गोधेकर, नरेश पेरे, राहुल गोदेकर, मंगेश पेरे, सुखदेव बजाज ,राजू पलय्ये, गौरव गोदेकर, श्याम शहाणे , शंकर कंकाळ, संजय शहाणे, नंदकिशोर येन्नावार यांच्या सह भाविक आणि कुंभार समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पान १ वरुन

## सेवा हक्क ...

पालिकेतील अधिकारी कर्मचाऱ्यांना लोक सेवेचे शपथ देऊन नागरिकांना आवश्यक त्या सेवा प्रदान करण्याच्या सूचना पालिका आयुक्तांनी केल्या आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ या कायद्याची अंमलबजावणी होऊन आज १० वर्ष पूर्ण झालेत.या निमित्ताने राज्यभरात सेवा हक्क दिवस साजरा केला जातो. जालना महापालिकेकडून पात्र नागरीकांना ७० सेवा दिल्या जातात.या अनुषंगाने अस्तित्वात असलेले कायदे नागरिकांचा अधिकार या अनुषंगाने महापालिका आयुक्तांनी एक वर्क शॉप आयोजित केल होतं.यामध्ये वर्षभरात चांगली सेवा दिली त्यांचा गौरव देखील करण्यात आला.तसेच नागरिकांना ऑनलाइन सेवा मिळण्यासाठी क्यूआरकोड देखील उपलब्ध करून देण्यात आले आहेत.,नागरीकांना सेवा मिळाव्यात यासाठी सेतू सुविधा केंद्र देखील सुरू करण्यात आले आहेत.यावर सेवा मिळण्यासाठी एक खिडकी देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरीकांना योग्य वेळेत सेवा न मिळाल्यास अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणार असल्याचा ईशारा महापालिका आयुक्तांनी दिला आहे.

## जाफराबाद आगारातून ...

जाफराबाद- शिर्डी (मार्गे सिल्लोड) या दोन बस सेवा रविवारपासून सुरू करण्यात आल्याची माहिती आगार प्रमुख राजपूत यांनी मंडळाला कळविली. त्याबद्दल मंडळाने जाफराबाद आगाराचे आभार मानले असून यातील जाफराबाद सोलापूर ही बस टेंभुर्णी येथील बस थांब्यावर सकाळी येताच त्या ठिकाणी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी या बसचे उत्साहात स्वागत करून चालक व वाहकांचा सत्कार केला. या पहिल्या बस सेवेसाठी वाहक म्हणून अंकुश जाधव यांनी तर चालक म्हणून प्रवीण जाधव यांनी सेवा बजावली.

ही बस आता दररोज सकाळी सहा वाजता जाफराबाद येथून निघणार आहे. दरम्यान जाफराबाद शिर्डी ही बस सेवा टेंभुर्णी, राजुर, खुलताबाद, वेरूळ या मार्गे सुरू करावी अशी मागणी ही मंडळाने आगाराकडे केली आहे. दरम्यान सोलापूर ही बस सेवा गेवराई, बीड, तुळजापूर या मार्गे सुरू झाल्याने आता तुळजापूर व पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांसाठी मोठी पर्वणी उपलब्ध झाली असल्याने त्यांच्यातून समाधान व्यक्त केल्या जात आहे.

या सत्काराच्या वेळी मानव सेवा मंडळाचे संजय राऊत, अलकेश सोमानी, भागाजी वाघमारे, सुनील अंभोरे, सुरेश बोर्डे, नसीम शेख आदींसह अशोक पाबळे, मुन्ना सिद्दिकी, विलास जमधडे, जगदीश शर्मा, देविदास घोडके, सखाराम बोरकर, रमेश इंगळे, कैलास तांबेकर, प्रल्हाद खांडेभराड आदींची उपस्थिती होती.

# महाड-पोलादपूर ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसाचा विकास करणार - ना. भरतशेठ गोगावले

**पोलादपूर । प्रतिनिधी** - रायगड जिल्ह्याला विशेषतः महाड आणि पोलादपूर तालुक्याला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या संपन्नतेचा वारसा लाभला आहे. प्रागैतिहासिक काळापासून मानवी संस्कृतीची जडण-घडण आपल्या जिल्ह्यात होत असल्याचे ठोस पुरावेदेखील अलिबाग, महाड सारख्या ठिकाणी उपलब्ध आहेत. शिवाजी महाराजांच्या काळात तर या भूमीत जन्मलेल्या शूरवीर मावळ्यांनी पराक्रमाची शर्थ करून स्वराज्याच्या स्थापनेसाठी मोलाची कामगिरी केली. नरवीर तान्हाजी मालुसरे, नरवीर सूर्याजी मालुसरे, नरवीर बाजीप्रभू देशपांडे, परमानंदबाबा, रायगड किल्ला, कांगोरी किल्ला, चंद्रगड किल्ला वैगरे इतिहासाच्या अनेक ऐत्याहासिक वारसाच्या खुणा अस्तित्वात आहेत. या वारशाची महती जगाला पटवून देण्यासाठी पर्यटनासारखा दुसरा पर्याय नाही. पर्यटन आणि ऐतिहासिक, सांस्कृतिक, नैसर्गिक, भौगोलिक स्थळांचा अतिशय नजीकचा संबंध येतो. कधीकाळी इतिहासाची सुवर्णपाने असलेली ही स्थळे जपण्याचा त्यांचे संवर्धन करण्याचा आटोकाट प्रयत्न मी करणार आहे. मला चार वेळा आमदार केलेत आणि आता मला मंत्रिपदावर तुमच्याच आशीर्वादाने विराजमान आहे. तुमच्याच नाईक मराठा समाजातल्या माणसाला राज्याचे मंत्रिपद मिळाले आहे असे भावपूर्ण उदगार महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री ना. भरतशेठ गोगावले यांनी काढले. पोलादपूर तालुक्यातील नरवीर सूर्याजी मालुसरे यांच्या साखर गावात ग्रामदैवत आई नवलाई-भैरी यांची पुनः प्राणप्रतिष्ठा ( जीर्णोद्धार ) आणि पुनर्रचित मंदिराचा उदघाटन सोहळा आयोजित केला होता त्याप्रसंगी कार्यक्रमात गोगावले बोलत होते. यावेळी तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

गोगावले पुढे असेही म्हणाले की, पर्यटनाच्या माध्यमातून या स्थळांचा विकास होत आहे. या स्थळांच्या संवर्धनासाठी नियोजन-कृतीचा आराखडा आखून या कामाकडे मी अधिक लक्ष देणार आहे कारण ही स्थळे रोजगारवृद्धी, अर्थकारणास चालना देणारी केंद्र ठरणार आहेत. साखर गावातील सुभेदार सूर्याजी मालुसरे यांची स्मृती समाधी ऐत्याहासिदृष्ट्या सुशोभित करण्यासाठी मी निधी उपलब्ध करून दिला आहे तो कमी पडणार नाही याची मी काळजी घेईल.

आई नवलाई ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष संतोष महादेवराव मालुसरे यांनी प्रास्ताविक करताना मुंबई बडोदे आणि गावातील सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून आभार मानले. अनेक शतकापूर्वीचे हे मंदिर आमच्या पुर्वजांनी १५० वर्षांपूर्वी नव्याने बांधले होते, आता त्याचे पुनरनिर्माण करून साखर गावातील नागरिकांनी स्वतःच्या आणि माहेरवासिनींच्या आर्थिक बळावर उच्च प्रतीचा दगड वापरून स्थापत्य शास्त्राचा उत्तम नमुना आणि आकर्षक सजावट असलेले मंदिर उभे राहिले आहे. आई नवलाई आणि एकूण ९ मूर्ती नवीन घडवल्या आहेत.आमच्यासाठी आमची गावपांढर हे एक जागृत देवस्थान असून आलेली संकटे आम्ही आईला सांगितली तर ती दूर होतात. नवस केल्यावर मनासारखं चांगले घडून आल्याचा अंतर्यामी विश्वास वाटतो, तसा प्रत्ययही येतो. आमचे पूर्वज सुभेदार सूर्याजी मालुसरे यांच्या समाधीच्या सुशोभीकरणासाठी मंत्रीमहोदय गोगावले यांनी फंड उपलब्ध करून दिला त्याबद्दल त्यांचेही मनापासून आभार मानले.

रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी आपल्या भाषणात साखर गावाचे पोलादपूर तालुक्यातील मोठेपण आणि महत्व सांगताना मालुसरे, चोरगे यांच्यासह साखर गावातील कर्तृत्ववान परंपरेचा इतिहास सांगितला. मी याच देवळात बसून दहावीपर्यंत अभ्यास केला आहे. राजकारणात आणि सामाजिक सामाजिक कार्यात नेतृत्व करू शकलो याचे कारण माझी या देवतेवर मनापासून श्रद्धा आहे हे यामुळेच घडले असावे. तर तालुक्यातील शिवसेनेचे ज्येष्ठ नेते सुभाष पवार आपल्या भाषणात म्हणाले की, अनेक पिढ्या समाजाचे नेतृत्व करणाऱ्या साखर ग्रामस्थांनी आपल्या पूर्वजांच्या कीर्तीला साजेल आणि तालुक्यात आजपर्यंत नाही असे सुंदर मंदिर उभे केले आहे. एकीचे बळ काय असते याची जाणीव जशी साखर गावाला झाली आहे तशीच ती समाजासमोर आदर्श कृती ठरणार आहे. शिवसेना





पोलादपूर तालुकाप्रमुख निलेश अहिरे म्हणाले की, माझ्या तीन पिढ्यांची या देवतेवर श्रद्धा आहे. या ग्रामदेवतेच्या चरणी नतमस्तक झाल्याशिवाय माझा एकही दिवस जात नाही. याप्रसंगी तालुका संपर्क प्रमुख किशोर जाधव, भाजपा तालुका अध्यक्ष तुकाराम केसरकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ज्ञानोबा केसरकर, सह्याद्री क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांतदादा मोरे यांचीही भाषणे झाली. यावेळी व्यासपीठावर लक्ष्मण मोरे (विभाग प्रमुख शिंदे गट,संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती), मनसे उपाध्यक्ष आणि कामगारसेना चिटणीस राज पार्टे,ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष निलेशदादा कोळसकर, शेकाप पोलादपूरचे ज्येष्ठ नेते निवृत्ती उतेकर, उद्योजक शिवरामशेठ केसरकर, शेकापचे सरचिटणीस वैभव चांदे, .प्रगतशील शेतकरी श्री. रामचंद्रशेठ कदम, उद्योजक चंद्रकांत कोंढाळकर, उद्योजक श्री. संजय उतेकर समाजसेवक सर्वश्री बापूराव बांदल, अनिल दळवी, भिवाशेठ उतेकर, नारायण साने, ज्ञानेश्वर सकपाळ, आनंदबुवा झाडाणे उपस्थित होते.

वेदशास्त्र संपन्न गुरुजी-संजय कुलकर्णी यांच्या मंत्रोच्चाराने गावातील ज्येष्ठ नागरिक धर्मभूषण आणि रायगड भूषण गुरुवर्य ह भ प श्री लक्ष्मण महाराज मालुसरे, श्री जयराम रामचंद्र बांद्रे, श्री बाबू तुकाराम चोरगे, श्री मारुती रामजी तांदळेकर, श्री गंगाराम सुभाना कदम, श्री विष्णू सखाराम सुतार यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. तर मुख्यदेवता आई नवलाई आणि जोगेश्वरी, वाघजाई, भैरी, बापदेव, महादेव, जननी, सालूबाई, कालभैरी या मूर्तीची स्वानंद सुखनिवासी प. पू. गुरुवर्य अरविंद नाथ महाराज यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा आणि कलशारोहन परमपूज्य योगीराज ब्रह्मचारी ह. भ. प. एकनाथ महाराज लाखे यांच्या हस्ते करण्यात आले.

ग्रामीण कमिटीचे अध्यक्ष विनायकदादा मालुसरे, प्रमुख मार्गदर्शक श्री ज्ञानोबा विठोबाराव मालुसरे आणि श्री पांडुरंग (शेठ) चिमाजी चोरगे यांच्या नेतृत्वाखाली भरत चिमाजी चोरगे (उपाध्यक्ष), बाजीराव विठोबा मालुसरे (सचिव), दिनकर धोंडू चोरगे (सह सचिव), सखाराम रामचंद्र बांद्रे (खजिनदार), दीपेश परशुराम मालुसरे (कार्याध्यक्ष), हनवती भिवा चोरगे (उपाध्यक्ष), दगडू शंकर मालुसरे (सचिव), संतोष शांताराम सुतार (खजिनदार) कमिटी सदस्य - लहू सखाराम मालुसरे, गोविंद धों चोरगे, अशोक रामचंद्र चोरगे, नारायण शंकर तांदळेकर, जयराम विठोबा चोरगे, धोंडू लक्ष्मण घावरे, गणेश तुकाराम सुतार, भगवान किसन पवार, नथुराम कोंडीराम सकपाळ, विजय मुकणे, दशरथ काशीराम चोरगे, महादेव दाजी कदम

राजेश लक्ष्मण तांदळेकर यांनी विशेष मेहनत घेतली. तीन दिवस हजारोच्या संख्येने भाविक उपस्थित होते, त्यांचा मानपान व स्वागत कार्यक्रम समन्वय समितीचे प्रमुख श्री रवींद्र तुकाराम मालुसरे, दगडू महादेव चोरगे, श्री विष्णू धों चोरगे, श्री विश्वनाथ हनवती मालुसरे,श्री कोंडीराम हरी सुतार यांनी केले.

नवीन मूर्तीचे गावात आगमन झाल्यानंतर टाळ-मृदंग, सनई-चौघडा, लेझीम, ढोल ताशा यांच्या गजरात शोभायात्रा काढून गाव प्रदक्षिणा करण्यात आली. दुसऱ्या दिवशी प्रधान संकल्प, श्री गणेश पूजन, पुण्यहवाचन, मुख्य देवता स्थापना, नवग्रह स्थापना, वास्तूप्रसाद होमहवन, मूर्तीचे अग्नुतारण, जलाधिवास, धान्याधिवास प्रधान हवन, मूर्तीचा पिंडिकान्यास, होम हवन करण्यात आले.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध हलगीवादक राजू आवळे पथक यांचे हलगी वादनाने कार्यक्रमाला बहार आली. साखर गावातील वारकऱ्यांचे सामुदायिक भजन, गावातील महिलांचा हरिपाठ आणि आळंदी येथील सुप्रसिद्ध निरुपणकार ह. भ. प.एकनाथ लाखे महाराज यांचे कीर्तन झाले. तालुक्यातील वारकरी संप्रदायाचे गुरुवर्य ह. भ. प. लक्ष्मणमहाराज मालुसरे, गणपत महाराज मोराणकर, भजनानंदी गायनाचार्य हरिभाऊ रिंगे महाराज यांचे श्रीगुरुपूजन यावेळी करण्यात आले.

महाराष्ट्रातील सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरा आहे. जागरण गोधळ हा एक विधी आहे ज्यामध्ये विशिष्ट इच्छा पूर्ण झाल्यानंतर रात्रभर देवतेचे स्मरण करीत जागरण केले जाते. रात्रौ १२ नंतर जेजुरी येथील सुप्रसिद्ध गोंधळी भाऊ पाचंगे यांनी जागरण गोंधळ घातला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवसेना उबाठाचे तालुकाप्रमुख अनिल मालुसरे, स्वप्नील चोरगे, पत्रकार दशरथ चोरगे, मिलिंद मालुसरे यांनी केले.

# दुष्टांचा संहार करणारा ब्राह्म-क्षात्र तेजयुक्त अवतार : भगवान परशुराम

भगवंताने विविध काळात भक्ताच्या आणि धर्माच्या रक्षणासाठी अवतार धारण करून धर्मसंस्थापन व अधर्मनाश केला. या अवतारांमध्ये भगवान परशुराम हे एक अत्यंत प्रभावशाली, तेजस्वी आणि अद्वितीय योद्धावतार आहेत. श्रीविष्णूचा सहावा अवतार असलेल्या परशुरामाने ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज यांचा उत्तम संगम करून अधर्माचा संहार केला.

**सप्तचिरंजीवांपैकी एक व काळावर विजय मिळवणारा अवतार**

भगवान परशुराम हे सप्त चिरंजीवांपैकी एक आहेत. त्यांनी काळावर विजय मिळवला आहे, म्हणून ते आजही अदृश्य रूपात पृथ्वीतलावर विद्यमान आहेत. त्यांचे स्मरण प्रातःकाळी केल्याने पुण्यप्राप्ती होते. हे आजच्या तणावपूर्ण जीवनात भक्तांसाठी प्रेरणादायक आहे. मनःशांती, संयम व पराक्रमासाठी त्यांचे स्मरण करतात.

**ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज यांचा संगम**

परशुराम जन्माने ब्राह्मण होते, पण त्यांनी क्षात्रतेज अंगीकारले. ते पित्याच्या ब्राह्मतेजामुळे ज्ञानी व तपस्वी होते, तर मातेकडून आलेल्या क्षात्रगुणांमुळे पराक्रमी व निर्भय योद्धा होते. आजच्या काळात जबाबदाऱ्या स्वीकारताना गुणावर आधारित कर्म हे तत्त्व त्यांनी कृतीने शिकवले.

**अपराजेय योद्धा व शिस्तप्रिय शिष्य**

परशुराम हे केवळ योद्धा नव्हते, तर अत्यंत शिस्तबद्ध व तपस्वी शिष्य होते. त्यांनी कश्यप मुनी आणि शिव यांच्याकडून ज्ञान प्राप्त केले. त्यांनी तपश्चर्येच्या बळावर दैविक अस्त्रविद्या मिळवली. आजच्या तरुणांनी, त्यांच्या शौर्याइतकेच, त्यांच्या साधनेचे व ज्ञानार्जनाचे अनुकरण करण्याची गरज आहे.

**शास्त्र आणि शस्त्र यांचा आदर्श समन्वय**


अग्रतः चतुरो वेदाः, पृष्ठतः सशरं धनुः या श्लोकाने परशुरामांच्या व्यक्तिमत्त्वाचे सार सांगितले आहे. त्यांच्या जीवनात ज्ञान आणि पराक्रम यांचा आदर्श संगम होता. त्यांनी शाप देऊन आणि शस्त्राने शत्रूंचा नाश केला. आजच्या युगात शिक्षण + शौर्य हे मूल्य गमावले जात असताना, परशुराम यांचे उदाहरण अत्यंत उपयुक्त आहे.

**अधर्माच्या विरोधात प्रखर संघर्ष**

कार्तवीर्य सहस्रार्जुनासारख्या अधर्मी राजाचा नाश करण्यासाठी त्यांनी आधी तपश्चर्या करून सूक्ष्म स्तरावर त्याचा पुण्यकेंद्र दुर्बल केले, मग प्रत्यक्ष युद्धात त्याला पराभूत केले. हे अधर्माच्या विरोधातील संघर्षाचे अद्वितीय उदाहरण आहे. समाजात अनीती वाढत असताना परशुरामांचा हा बाणा आदर्श ठरतो.

**गोमातेचे रक्षण आणि क्षत्रिय संहार**

कार्तवीर्याने कामधेनूचे अपहरण केल्यावर, परशुरामाने ती परत आणण्यासाठी उन्मत्त क्षत्रिय संहाराचा संकल्प केला.




२१ वेळा पृथ्वी प्रदक्षिणा करून त्यांनी अधर्मी क्षत्रियांना संपवले. यातून 'धर्मासाठी उठलेली शस्त्रे कधीही पवित्र असतात' हे शिकवण मिळते.

**वैराग्य आणि दानशूरता**

गवान परशुराम अत्यंत दानशूर होते. अश्वमेध यज्ञात त्यांनी संपूर्ण भूमी महर्षी कश्यप यांना दान दिली आणि स्वतः महेंद्र पर्वतावर निवास करून संन्यस्त जीवन स्वीकारले. आजच्या काळात सत्ता, संपत्ती आणि अहंकार वाढत असताना त्यांच्या वैराग्याचा आदर्श अत्यंत प्रेरणादायक आहे.

**नवसृष्टीचे सर्जनशील कार्य**

परशुरामभूमीची निर्मिती ही केवळ भौगोलिक नव्हे तर आध्यात्मिक नवसृष्टी होती. त्यांनी चितेतून चित्तपावन ब्राह्मणांची निर्मिती करून धर्मकार्याला नवा आयाम दिला. सृजनशीलतेसाठी आंतरिक तेजाचे महत्त्व ते शिकवतात.

**गुरुशिष्य परंपरेचे पालन**

भगवान परशुराम हे शिव आणि दत्तात्रेय या दोन अद्वितीय गुरूंचे शिष्य होते. त्यांनी त्यांच्याकडून वेद, आत्मज्ञान, अस्त्रविद्या आणि योगविद्या मिळवली. आजची शिक्षणपद्धती जेव्हा केवळ अंकगणित व तंत्रज्ञानात मर्यादित होते, तेव्हा त्यांच्या गुरुसेवेतील समर्पण आपल्या मनात जागृती निर्माण करते.

**आधुनिक काळातील संदर्भ व महत्त्व**

आजच्या काळात समाजात अनीती, भ्रष्टाचार, अन्याय आणि नैतिक अधःपतन वाढले आहे. अशा वेळी भगवान परशुराम यांची शिकवण धर्मासाठी कठोर निर्णय, ज्ञान आणि शौर्याचा समन्वय, गुरुशिष्य भाव, वैराग्य आणि राष्ट्रनिष्ठ यांचे महत्त्व अधिक वाढते.

युवा पिढीने परशुरामांचे गुण आत्मसात केल्यास ती सामर्थ्यवान, विवेकी आणि निःस्वार्थी होईल. महिलांचा सन्मान, धर्मसंरक्षण, ज्ञानार्जन, संयम आणि आचारधर्म यांचा संगम साधून राष्ट्रविकासात भर घालता येईल.

भगवान परशुराम हे एक महान योद्धा, पराक्रमी तपस्वी, आणि द्रष्टे होते. अशा या ब्राह्मतेजाने आणि क्षात्रतेजाने युक्त अवतारास शिरसाष्टांग नमस्कार करीत, त्यांच्या आदर्शांनी प्रेरणा घेऊन, आपणही जीवनात धर्म व कर्तव्य निष्ठेने जगावे, हाच त्यांच्या चरणी खरा नमस्कार ठरेल.

**संकलक : सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

# लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी - जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा नागरिकांना सेवेचा हक्क देणारा महत्वाचा कायदा आहे. या कायद्यान्वये नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबद्ध सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज येथे केले.

येथील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित सेवा हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी जिल्ह्यामधील लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, पत्रकार, नागरीक जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी तसेच अधिकारी व अधिनस्त कार्यालये आदी यावेळी उपस्थित होते. तसेच यावेळी सेवेच्या बांधिलकी मानणारी शपथ घेण्यात आली.

यावेळी डॉ. पांचाळ मार्गदर्शन करतांना म्हणाले की, सेवा हक्क कायदा संपूर्ण राज्यात सर्व शासकीय सेवा देणाऱ्या विभागांसाठी लागू करण्यात आला आहे. या कायद्यामुळे नागरिकांना विहित कालमर्यादेत शासकीय विभागांच्या अधिसूचित सेवा मिळविण्याचा अधिकारी प्राप्त झालेला आहे. त्यामुळे शासकीय विभागाच्या अधिसूचीत सेवा विहित कालमर्यादेत नागरिकांना पुरविणे बंधनकारक आहे. शासनाच्या विविध योजना व सेवांचा लाभ नागरिकांना सुलभरित्या व तत्परतेने घेता यावा, यासाठी आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या अधिकतम सेवा अधिसूचित करण्यासोबतच कायद्याच्या जनजागृतीसाठी विभागप्रमुखांनी प्रयत्न करणे आवश्क आहे. तसेच कायद्याची योग्य अंमलबजावणी देखील करणे आवश्यक आहे. या कायद्याची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली असल्याचे देखील डॉ. पांचाळ यावेळी म्हणाले.

यावेळी कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध विभाग प्रमुख यांच्यासह अधिकारी कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती..

नागरीकांना जलद गतीने सेवा देणाऱ्या नायब तहसीलदार मंगेश साबळे,तहसील कार्यालय जाफ्राबादाचे नायब तहसीलदार राजु निहाळ, तहसिल कार्यालय जालन्याचे नायब तहसीलदार कृष्णा फुलमाळी, अनुराधा नागोरी यांचा तसेच खुली निबंध स्पर्धेतील प्रथम,द्वि तीय



व तृतीय पारितोषिक आणि प्रशस्तीपत्र अविनाश जगताप व आसेफ पठाण , ओंकार घाटुळे यांचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

## राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देत इम्तियाज मणियार यांचा भाजपात प्रवेश



**शहागड । प्रतिनिधी -** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला आज शहागडमध्ये मोठा धक्का बसला. पक्षाचे कट्टर समर्थक आणि शहागडमधील जाणते कार्यकर्ते इम्तियाज बाबूमिया मणियार यांनी भारतीय जनता पक्षात (भाजपा) जाहीर प्रवेश केला आहे. मानियार यांनी भाजप नेते सतीश घाटगे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पक्ष प्रवेश केला . तालुका भाजपा प्रमुख शिवाजी नाना मोरे आणि इम्रान पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली मणियार यांनी भाजपाचे सदस्यत्व स्वीकारले.

या पक्षप्रवेश सोहळ्यादरम्यान, भाजप नेते सतीश घाटगे यांनी इम्तियाज मणियार यांचे पक्षात स्वागत केले आणि त्यांचा सत्कारही केला. यावेळी डॉ. रमेश तारगे यांच्यासह भाजपाचे अनेक प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

इम्तियाज मणियार हे शहागडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे एक निष्ठावान आणि सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांचा भाजपातील प्रवेश हा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेससाठी झटका मानला जात आहे.

या घडामोडीवर प्रतिक्रिया देताना सतीश घाटगे म्हणाले, इम्तियाज मणियार यांच्यासारख्या कार्यकर्त्याचा भाजपात प्रवेश होणे हे पक्षासाठी निश्चितच सकारात्मक बाब आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि जनसंपर्काचा फायदा पक्षाला होईल.

शिवाजी नाना मोरे यांनी सांगितले की, इम्तियाज भाईंचे भाजपात स्वागत आहे. त्यांच्या येण्याने पक्षाची ताकद निश्चितच वाढेल आणि शहागडमध्ये भाजपा अधिक प्रभावीपणे काम करू शकेल.

दरम्यान, इम्तियाज मणियार यांच्या प्रतिक्रियेसाठी संपर्क साधला असता, त्यांनी सांगितले की, सतीश घाटगे यांच्या नेतृत्वावर माझा पूर्ण विश्वास आहे आणि त्यांच्या विकासकामांच्या दृष्टिकोनातून प्रेरित होऊन मी भाजपात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी - प्रा.डॉ पांडूरंग नवल

**मंठा । प्रतिनिधी -** स्वामी विवेकानंद महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रंसगी मान्यवरांच्या शुभहस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तद्नंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्रा डॉ पांडूरंग नवल म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने एक आदर्श विद्यार्थी होते त्यांनी त्यांचे जीवन एक आदर्श विद्यार्थी म्हणून जगले ते म्हणत बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष असले पाहिजे. आपण काहीतरी शिकत राहिले पाहिजे, आपले ज्ञान वाढविण्यावर भर दिला पाहिजे. तसेच ते पुढे म्हणाले की शिक्षणाबरोबरच देशात चाललेल्या हालचालींचे शिक्षण घेणे तितकेच महत्त्वाचे आहे व पुढील काळात विद्यार्थ्यांनी कर्तबदार बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे व मिळालेल्या संधीचा वेळीच योग्य फायदा करून घेतला पाहिजे अशी महत्त्वपूर्ण माहिती प्रमुख वक्ते प्रा. पांडूरंग नवल यांनी दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ माणिकराव थिटे यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ सुधाकर जाधव, प्रा.डॉ.



सदाशिव कमळकर तसेच प्रा.डॉ. दक्षता देशमुख यांची विचार मंचावर उपस्थिती होती.

कार्यक्रमांचे प्रस्थाविक प्रा. वसंत जागृत यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विनायक काळे यांनी केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी निबंध व प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती . कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ. राजेश गायकवाड, प्रा. के. एम कांबळे, प्रा.डॉ. तुषार धोंडगे, प्रा.डॉ संतोष वानखडे, डॉ वसंत जागृत, डॉ. गजानन मुळे कार्यालयीन अधिक्षक दत्तात्रय कडूकर, मुख्य लिपीक अशोक मुळे व महाविद्यलयीन विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्रा. डॉ राजेश गायकवाड यांनी उपस्थित यांचे आभार व्यक्त केले.

## जालन्यात पाच पाकिस्तानी नागरिक; दीर्घकाळाच्या व्हिसामुळे कारवाईतून सुट

**जालना -** सरकारच्या आदेशानंतर जालन्यातही पोलिसांकडून पाकिस्तानी नागरीकांचा शोध घेण्यात आलाय. यात ५ पाकिस्तानी नागरिक जालन्यात वास्तव्यास असल्याचं समोर आले आहे. पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने पाकिस्तानशी संबंधित सगळे व्हिसा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. दीर्घकालीन व्हिसासाठी सदरील आदेश लागू होत नसल्यामुळे जालन्यातील पाच नागरिकांना देश सोडण्याची आवश्यकता नाही.

भाजपा हा लोकशाही मानणारा आणि जपणारा पक्ष

## सर्वानुमते जिल्हाध्यक्षपदाचा उमेदवार ठरवणे ही प्रक्रिया केवळ भाजपामध्ये - आमदार लोणीकर



**नांदेड । प्रतिनिधी-** भारतीय जनता पार्टी हा लोकशाही मानणारा आणि जपणारा पक्ष असून सर्वसामान्य व्यक्तीला आपल्या कार्यकर्तुत्वाच्या बळावर भारतीय जनता पक्षाचा शाखाप्रमुख पसून ते पंतप्रधान पदापर्यंत पोहोचता येऊ शकत याचे उत्तम उदाहरण म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी होय. सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला त्याच्या कर्तृतच्या बळावर पक्ष संघटनेत मानाचे स्थान मिळू शकते पक्ष संघटनेला वेळ देणारा आणि तळागाळातील जनसामान्यांपर्यंत पक्षाचे ध्येय धोरणे घेऊन जाणाऱ्या व्यक्तीला तसेच भाजपा कोअर कमिटीच्या सदस्यांनी सर्वांमध्ये ठरवलेल्या उमेदवाराला भारतीय जनता पार्टीचा नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष म्हणून पक्षाच्या वतीने संधी दिली जाईल. सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्ष निवडणे ही प्रक्रिया केवळ भारतीय जनता पार्टीमध्ये आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले की, जिल्हाध्यक्ष पदासाठी इच्छुक उमेदवार ४५ ते ६० वयोगटातील असावा असे पक्षाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे त्यामुळे वयाबरोबरच इच्छुक उमेदवार संघटनेचा अनुभवी कार्यकर्ता असावा या अर्हतेबाबत तडजोड होणार नाही. त्या उमेदवाराने यापूर्वी संघटनेच्या जबाबदारीच्या पदावर काम केलेले असावे तसेच इच्छुक उमेदवार सक्रिय सदस्य असला पाहिजे असेही पक्षाच्यावतीने स्पष्ट करण्यात आले असल्याचे लोणीकर म्हणाले.

नांदेड येथे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या बैठकीमध्ये नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष पदासाठी इच्छुक उमेदवार व कोअर कमिटीच्या सदस्यांशी सविस्तर चर्चा करून सर्वांची मते जाणून घेण्यात आली. यामध्ये माजी मुख्यमंत्री राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण, जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, आमदार राजेश पवार, आमदार तुषार राठोड, आमदार जितेश अंतापूरकर, माजी आमदार राम पाटील रातोळीकर, सुधाकर भोयर, एकनाथ पवार, देविदास राठोड यांच्यासह कमिटीच्या अनेक सदस्यांचा समावेश होता. यावेळी माधवराव पाटील उच्चेकर, लक्ष्मणराव ठक्करवाड माणिकराव लोहगावे चित्ररेखा गोरे सतीश गौड पुनमताई पवार गंगाधर कावडे राजेंद्र रेड्डी रामराव केंद्रे यांच्यासह लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंबईत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चे भव्य आयोजन

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्घाटनासाठी उपस्थित राहणार - उद्योग मंत्री उदय सामंत

**मुंबई । प्रतिनिधी -** मुंबई बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे १ ते ४ मे २०२५ पर्यंत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमाचे १ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी बीकेसी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी १ मे रोजी संपूर्ण दिवसभर मुंबईत उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या सोबत परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित



पवार यांचाही सहभाग राहणार आहे.

उद्योग मंत्री सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले की, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. विशेषतः हिंदी चित्रपटसृष्टीचे माहेरघर हे मुंबईला म्हटले जाते. भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनी याच महाराष्ट्रामध्ये मराठी चित्रपट सुरू केले. त्यामुळे मनोरंजनाच्या क्षेत्रात मुंबई ही देशात अग्रगण्य शहर आहे. त्याचबरोबर, गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक ही एक नंबरला आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रात देखील महाराष्ट्र आणि मुंबई एक नंबरला राहिलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने देखील महाराष्ट्र या देशाच्या पातळीवर अन्य देशांशी स्पर्धा करतो आहे. म्हणून पर्यटनाची सगळी स्थळे जागतिक पातळीवर जावी, हा देखील या वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा उद्देश आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, औद्योगिक व पर्यटन संस्कृती आणि ज्या काही महाराष्ट्राच्या परंपरा आहेत, त्या जागतिक पातळीवर जाव्यात, यासाठी मुंबई शहराची निवड केंद्र शासनाने केली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले

उद्योग मंत्री सामंत यांनी सांगितले की, या कार्यक्रमात ३३ देशांतील मंत्री व मंत्रीस्तरीय अधिकारी, तसेच १२० आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. बॉलिवूड, टॉलीवूड, मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार व निर्मातेही कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

या चार दिवसीय सोहळ्यात भारत पॅव्हेलियन, महाराष्ट्र पॅव्हेलियन, तेलंगणा पॅव्हेलियन तसेच अन्य संस्थांचेही पॅव्हेलियन उभारण्यात येणार आहेत. त्यांचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. विविध क्षेत्रांतील परिसंवाद, राउंड टेबल कॉन्फरन्स, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असेल. विशेषतः तिसऱ्या दिवशी म्हणजे ३ मे रोजी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर ए. आर. रहमान यांच्या सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, औद्योगिक व पर्यटन क्षेत्राला जागतिक स्तरावर नेण्याची संधी आहे. या भव्य आयोजनासाठी राज्य शासनाला सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे, असे आवाहनही उदय सामंत यांनी केले.




## सुरेश डहाके तरुणाचा अपघातात मृत्यू

### जमीन फाटा म्हणजे अपघात स्थळ, गतिरोधक टाकणे गरजेचे

टेंभुर्णी येथील शेतकरी हे आपल्या मोटार सायकल ने प्रवास करता वेळी झालेल्या अपघातात सुरेश रुस्तुम डहाके यांचे अपघाती निधन झाले.इलाज घेता वेळी काल दुपारी दोन वाजता निधन झाले.मृत्यु वेळी त्यांचे ४५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा एक मुलगी आई भाऊ असा परिवार आहे. त्यांचा अंत्यसंस्कार जिवरेखा नदीवर रात्री करण्यात आला. या वेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.दिनांक २३ रोजी जाफ्राबाद टेंभुर्णी रोड वर जिनिग जवळ झालेल्या मोटार सायकल आणि शिफ्ट डिझायर गाडीच्या अपघात नंतर सुरेश यांचा जालना येथील एका खाजगी रुग्णालयात इलाज सुरू होता. मात्र अपघात मोठा असल्याने शेवटी त्यांची काल प्राण ज्योत मावळली.या अपघाताची नोंद पोलिस स्टेशन मध्ये झालेली असून आता पुढील तपास सचिन खामगळ हे करत आहे. टेंभुर्णी मध्ये जिनिंग फाटा म्हणून प्रसिद्ध असलेल्या ठिकाणी वरदळ जास्त असते, हे ठिकाण म्हणजे अपघात क्षेत्र आहे. या ठिकाणी नागरिकांची गर्दी जास्त असते. या ठिकाणी रस्त्याला कर्व्ह आहे. रस्त्यावरून येणारी वाहन ही भरदा वेगाने जाताना कोणीच त्याला हटकत नाही. दोन्ही बाजूंनी हॉटेलमध्ये गर्दी असते. वाहन रस्त्याला उभी असतात. जाणारा येणाऱ्यांची संख्या जास्त असते. तसेच येथे नवभारत शिक्षण संस्थेच्या जय बिके विद्यालयातील विद्यार्थी सुद्धा बस मध्ये बसण्यासाठी येत असतात. परंतु कोणीही या ठिकाणी गतिरोधक टाकण्याचा आग्रह धरताना दिसत नाही. शाळेकडून एकदा पीडब्ल्यूडी ला कळवले होते परंतु त्यांनी सुद्धा काळजी घेतलेली नाही. आता तरी या तरुणाचा मृत्यू झाल्यानंतर गतिरोधक बसतील काय याकडे लक्ष लागून आहें.

# नितीन राठोड यांची भाजपा मंठा तालुका अध्यक्षपदी निवड

## युवा मोर्चा तालुका अध्यक्षपदी आनंद जाधव तर शहराध्यक्षपदी दीपक बोराडे व सरपंच संघटना अध्यक्षपदी अमोल मोरे यांची नियुक्ती

**मंठा । प्रतिनिधी -** माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी भाजपा परतुर तालुका अध्यक्ष पदाची धुरा माझ्या खांद्यावर सोपवली असून, त्यांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा न जाऊ देता तालुक्यातील गावागावातील शेवटच्या घटकापर्यंत पक्ष पोहोचवण्याची काम आपण करणार असल्याचे भाजपा तालुकाध्यक्ष नितीन राठोड यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

नितीन राठोड यांची नुकतीच भाजपा मंठा तालुका अध्यक्ष पदी निवड झाली असून, पक्षाचे बळ वाढवण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन आपण काम करणार असून येणाऱ्या निवडणुकांमध्ये भाजपा क्रमांक एकचा पक्ष राहील यासाठी आपण सदैव प्रयत्नरत राहणार असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आली आहे.

पुढे या पत्रकात म्हटले आहे की, सर्व समाजाच्या घटकांना सोबत घेऊन पक्षाचे कामकाज करणार असून, पक्ष हिताच्या निर्णयासाठी आपण कायम वचनबद्ध असल्याचे त्यांनी म्हटले आहे. माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वाखाली मंठा तालुक्यात विधानसभा मतदारसंघांमध्ये अनेक विकास कामे झालेली असून त्यांनी केलेल्या विकास कामांच्या बळावरच आपण पक्ष वाढीसाठी शेवटच्या घटकापर्यंत पोहोचू असा विश्वास त्यांनी या पत्रकामध्ये बोलून दाखवला आहे.

नितीन राठोड यांची भाजपा तालुकाध्यक्षपदी भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष पदी आनंद जाधव तर भाजपा शहराध्यक्ष पदी दीपक बोराडे व सरपंच संघटना अध्यक्ष पदी अमोल मोरे यांची निवड



झाल्याबद्दल त्यांचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, संदीप गोरे, गणेश खवणे, बाबुराव शहाणे, अंकुशराव अवचार, पंजाब बोराडे, सतीश निर्वळ, कैलास बोराडे, राजेश मोरे, विठ्ठलराव काळे, सुरेश सरोदे, नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे, विलास घोडके, नगरसेवक प्रसाद बोराडे, नगरसेवक विकास सूर्यवंशी, मुस्तफा पठाण, गणेश चव्हाळ, नगरसेवक शेषनारायण दवणे, संजय गायकवाड, समदंर पठाण, अभिजित कोदंडे, वैभव नरवडे, पांडुरंग चव्हाळ, नितीन सरकटे, तोफीक कुरेशी, कपिल तिवारी, अजिंक्य खवणे, आदित्य दवणे, पंकज राठोड, शरद मोरे, अमोल चव्हाळ, श्रीराम राठोड, रोहिदास टिप्परकर, ईश्वर आघाम, धम्मानंद वाघमारे यांच्या सह मोठ्या संख्येने भाजपा कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

# भगवान परशुरान जयंतीनिमित्त १२१ दात्यांचे रक्तदान

## भगवान परशुराम युवा दलाचा उपक्रम



**जालना । प्रतिनिधी -** आज जालन्यात भगवान परशुराम जयंतीनिमित्त भगवान परशुराम युवा दलाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सुरुवातीला सर्व गुरुजींनी शांतीपाठ घेऊन भगवान परशुराम जयंतीचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून भगवान परशुरामाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. सकाळची १० वाजता या कार्यक्रमाला सुरुवात झाली होती व संध्याकाळी जवळपास ६.३० वाजता या शिबिराचा समारोप करण्यात आला. यामध्ये १०८ पुरुषांनी तर १३ महिलांनी रक्तदान केले असे एकूण १२१ लोकांनी अगदी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला आहे.

या उपक्रमाचे आयोजन श्री भगवान परशुराम युवा दलाच्या वतीने करण्यात आले होते.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी तरुणांनी विशेष मेहनत घेतली. सर्व ठिकाणी या उपक्रमाचे कौतुक होत असून सामाजिक भान आणि एकोप्याची भावना अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त करत आहेत.

यावेळी विविध समाजबांधवांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवला. या सहकार्याबद्दल भगवान परशुराम युवा दलाच्या वतीने सर्व रक्तदात्यांची आणि नागरिकांची ऋणी असल्याचे त्यांनी सांगितले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.